**विशेष सूचना** :-जलसंपदा/ जलसंधारण विभागात **कनिष्ठ अभियंता (स्था) गट "ब" (अराजपत्रित) स्तरावरील १२५६** रिक्त पदाच्या भरती प्रक्रियेची जाहिरात (क्र. ०१/२०१६)/ दि. १८.२.२०१६ चे विविध वृत्तपत्रांतुन प्रसिद्ध करण्यांत आलेली होती.

सदर भरती प्रक्रियेसंदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर / औरंगाबाद तसेच मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यामुळे ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया **दि. ९.३.२०१६** पासून स्थगित ठेवण्यात आलेली होती.

मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे **दिनांक १८/७/२०१६** रोजीचे निर्णयाचे अनुषंगाने सदर भरती प्रक्रिया आता पुन्हा सुरु करण्यांत येत आहे. तसेच सदर परीक्षेकरीता स्थापत्य पदविकाधारक किंवा समतुल्य अर्हता धारण करणारे उमेदवारच पात्र राहतील. **यापूर्वी ज्या उमेदवारांनी अर्ज केलेले आहेत त्यांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. त्यांनी पूर्वी सादर केलेले अर्जच ग्राह्य धरण्यात येतील.**

# महाराष्ट्र शासन

## जलसंपदा विभाग

### कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती, नागपूर

### कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) सरळसेवा परीक्षा २०१६

जाहिरात क्रमांक: **०१** सन **२०१६**

शासनाच्या जलसंपदा विभाग/ जलसंधारण विभागातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या एकूण **१२५६** पदांच्या भरतीकरीता कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती, नागपूर यांचे वतीने **मे.महाऑनलाईन लि. मुंबई** यांच्यामार्फत **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) सरळसेवा परीक्षा शनिवार, दिनांक २७/०८/२०१६** रोजी महाराष्ट्रातील **पुणे/ मुंबई-ठाणे/ नागपूर/अमरावती/ औरंगाबाद/ नाशिक** या **६ विभागातील शक्यतो खालील जिल्हास्थानी घेण्यात येईल.**

(१) अहमदनगर (२) अकोला (३) अमरावती (४) औरंगाबाद (५) बीड (६) भंडारा (७) बुलढाणा (८) चंद्रपूर (९) धुळे (१०) गडचिरोली (११) गोंदिया (१२) हिंगोली (१३) जळगाव (१४) जालना (१५) कोल्हापूर (१६) लातुर (१७) मुंबई शहर (१८) मुंबई उपनगर (१९) नागपूर (२०) नांदेड (२१) नंदुरबार (२२) नाशिक (२३) उस्मानाबाद (२४) परभणी (२५) पुणे (२६) रायगड (२७) रत्नागीरी (२८) सांगली (२९) सातारा (३०) सिंधुदुर्ग (३१) सोलापूर (३२) ठाणे (३३) वर्धा (३४) वाशिम (३५) यवतमाळ (३६) पालघर

२. वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या जलसंपदा विभागाच्या /जलसंधारण विभागाच्या सूचनेनुसार वाढ किंवा घट करण्याचे अधिकार **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती, नागपूर** यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

३. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांकडूनच **ऑनलाईन पध्दतीने** अर्ज मागविण्यात येत आहेत.

४. **जे उमेदवार अर्जामध्ये चुकीची / खोटी माहिती सादर करतील त्यांना या निवड प्रक्रियेतील निवडीच्या पुढील कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्यात येईल.**

५. निवड प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यातील वाद व तक्रारींबाबत निर्णय घेण्याचा अधिकार **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती, नागपूर यांना असेल व समितीचा निर्णय अंतिम राहील.**

६. उपलब्ध पदसंख्या :- १२५६ पदे

| अ. क्र. | प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | वि.जा. (अ) | भ. ज. (ब) | भ. ज. (क) | भ. ज. (ड) | वि मा प्र | इ.मा.व. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १ | **सर्वसाधारण** | **९२** | **१०४** | **३३** | **१३** | **४२** | **१७** | **१** | **१०७** | **४०९** | **८१८** |
| | **महिला (३०%)** | **४२** | **४८** | **१६** | **६** | **२०** | **७** | **०** | **४९** | **१८८** | **३७६** |
| | **खेळाडू (5%)** | **७** | **८** | **३** | **१** | **३** | **१** | **०** | **८** | **३१** | **६२** |
| | **एकूण** | **१४१** | **१६०** | **५२** | **२०** | **६५** | **२५** | **१** | **१६४** | **६२८** | **१२५६** |
| | **विकलांग व्यक्ती** | **१२५६ पदांपैकी एकूण — २५ पदे ही विकलांगासाठी आरक्षित असून हि पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत.** | | | | | | | | | |
| **अस्थिव्यंग (O.A./ O.L., Either One Arm or One Leg) — १३ पदे, कर्णबधीर (HearingHandicapped) — १२ पदे राखीव असे एकूण २५ पदे** | | | | | | | | | | | |
| **१२५६ पदांपैकी ८४ पदे जलसंधारण विभागाची आहेत.** | | | | | | | | | | | |

७. वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), व भ.ज.(ड) वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदांसाठी संबंधीत वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवारांचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

७.१ **महिला व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे संबंधीत वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.**

७.२ महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक:८२/२००१/म.से.आ.२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे, २००१आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार राहील.

७.३ खेळाडूंचे आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार राहील.खेळाडू वर्गवारीसाठी दावा करणाऱ्या उमेदवारांनी त्यांची खेळाडूबाबतची प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवक संचालनालय, पुणे यांच्याकडून प्रमाणित केलेली असणे अनिवार्य राहील.

७.४ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

७.५ परिक्षेच्या कोणत्याही टप्प्यांवर मागासवर्गीयांसाठी विहित केलेली वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक अटी/ निकषांसंदर्भात कोणतीही सूट/ सवलत घेतली असल्यास अशा उमेदवारांची अमागास (सर्वसाधारण) पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

७.६ **विकलांग उमेदवारांच्या पात्रतेचे निकष शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार राहतील, विकलांगांसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.**

८. **वेतनश्रेणी :- रुपये ९,३००-३४,८०० (ग्रेड पे ४,३००) अधिक नियमानुसार भत्ते.**

**९. पात्रतेच्या अटी :-**

९.१ अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र अर्जदाराकडे असणे आवश्यक आहे. अर्जदाराकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०, दिनांक २७ जून, २०११ नुसार अर्जदाराकडे महाराष्ट्र राज्यात जन्म झाल्याबाबतचा पुरावा असणे आवश्यक आहे.

९.२ अर्जदाराने दिनांक **०७/०८/२०१६** रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली असावी, मात्र अर्जदाराचे वय ३८ वर्षापेक्षा अधिक नसावे.

**९.३ उच्च वयोमर्यादा खालीलप्रमाणे शिथिल करण्यात येईल. :-**

९.३.१ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत. (वयाच्या ४३ वर्षापर्यंत)

९.३.२ विकलांग उमेदवारांच्या बाबतीत वयाच्या ४५ वर्षांपर्यंत.

९.३.३ पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत. (मात्र कमाल वयोमर्यादा ४३ वर्षापर्यंत)

९.३.४ शासकीय सेवेतील कर्मचारी यांचेसाठी वयाच्या ४५ वर्षांपर्यंत.

९.३.५ विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

९.३.६ वयोमर्यादा शिथिलतेबाबत कोणतीही एक सवलत (अधिकतम) लागू होईल.

**१०. निवडीसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता :-**

१०.१ माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण व

१०.२ सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पाटबंधारे विभाग यातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-'ब' अराजपत्रित पदांचे सेवाप्रवेश (सुधारणा) नियम १९९८ नुसार शासनमान्य तीन वर्षे कालावधीची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदविका (Diploma in Civil Engineering) अथवा "अंशकालीक" किंवा "दूरशिक्षण पदविका" म्हणजे जी तीन वर्षे कालावधीच्या स्थापत्य अभियांत्रिकी पदविकेशी समतुल्य आहे अशी, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी मान्यता दिलेली पदविका.

"समतुल्य अर्हता" यामध्ये मान्यताप्राप्त विद्यापीठाकडून/महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या खालीलप्रमाणे पदविका (कालावधी ३ वर्ष)

- सिव्हील व रुरल इंजिनिअरिंग मधील पदविका
- सिव्हील इंजिनिअरींग आणि रुरल कन्स्ट्रक्शन मधील पदविका
- ट्रान्सपोर्टेशन इंजिनिअरिंग मधील पदविका
- कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी मधील पदविका

१०.३ **उपरोक्त नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व इतर सर्व अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे दिनांक ७.८.२०१६ रोजी धारण केलेली असणे अनिवार्य आहे. त्यानंतरच्या दिनांकाची प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.**

१०.४ **नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-**

१०.४.१. जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय / व्यावसायिक परिक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/ व्यावसायिक परीक्षा.

१०.४.२ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा. उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

१०.४.३ महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

**११.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षे संदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, परीक्षेच्या प्रवेशासाठी माहिती स्विकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रीया, परीक्षायोजना, इत्यादीबाबतचा **सविस्तर तपशील http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) सरळसेवा परीक्षा २०१६ अंतर्गत उमेदवारांना "सर्वसाधारण सूचना" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्या माहितीचे उमेदवाराने अवलोकन करावे.**

**१२. शुल्क :-**

| | |
|---|---|
| **१२.१ अमागास** | **:- रु. ७००/-** |
| **१२.२ मागासवर्गीय** | **:- रु. ३५०/-** |
| **१२.३ विकलांग व्यक्ती** | **:- रु. ३५०/-** |

**१३. अर्ज करण्याची पध्दत :-**

१३.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने दि.७/८/२०१६ पर्यंत स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

१३.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज दिनांक **२१/७/२०१६** ते दिनांक **७/८/२०१६** या कालावधीतच **http://maharecruitment.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील.

१३.३ **http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या "सर्वसाधारण सूचना" उपलब्ध आहेत. त्याचे काळजीपूर्वक वाचन करुन ऑन लाईन अर्ज सादर करावा.**

१३.४ उमेदवाराने जाहिरात व सर्वसाधारण सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात. ऑनलाईन अर्ज करण्यासाठी उपरोक्त संकेतस्थळावर "Apply Online" या लिंकवर क्लिक करुन सर्वप्रथम प्राथमिक माहिती भरावी. यानंतर रजिस्टर (Register) या बटणावर क्लिक करुन अर्जाची नोंदणी करावी. अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. आवश्यक माहिती भरल्यानंतर नोंदणी झाल्यावर संगणक प्रणाली तुमचा लॉग-इन आयडी आणि पासवर्ड निर्माण करुन तुम्हाला तुमच्या स्क्रिनवर दाखवेल. याची प्रिंट काढण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतांना उमेदवाराने स्वत:चा अद्यावत फोटो (रूंदी ३.० से.मी. X उंची ४.५ सेमी.) व स्वत:ची स्वाक्षरी (रूंदी ३.० से.मी. X उंची २.५ सेमी.) आणि ३०० DPI Resolution आणि ५० KB पेक्षा कमी साईज होईल अशा विहीत प्रध्दतीने स्कॅन करून अपलोड करणे अनिवार्य आहे. (टिप :- फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्यांचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी) प्रवेशपत्रावर /अर्जावर दुसऱ्याचा फोटो /स्वाक्षरी असल्यास उमेदवारास निवडीच्या टप्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याच्या सुचना **http://maharecruitment.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असतील. अर्ज ऑनलाईन अथवा महा ई-सेवा केंद्रा व्दारे भरता येईल. महा.ऑनलाईन लि. या संस्थेकडून प्रत्येक जिल्हयात महा ई-सेवा केंद्र उघडण्यांत आलेले आहे. या महा ई-सेवा केंद्राची यादी http://mahaonline.gov.in किंवा http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उमेदवाराने यापुर्वी http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर आपले खाते तयार केले नसल्यास उमेदवारास "नविन वापर कर्ता नोंदणी" वर क्लिक करून युझर नेम व पासवर्ड तयार करावा लागेल.

त्यानंतर उमेदवारास "प्रोफाईल निर्मिती" मध्ये जाऊन स्वत:ची संपूर्ण भरावी लागेल http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर या पूर्वी प्रोफाईल निर्मिती मध्ये जाऊन स्वत:ची माहिती भरलेली असल्यास पुन्हा भरावयाची आवश्यकता नाही. उमेदवार स्वत:ची प्रोफाईल माहिती कधीही अद्यावत करू शकतो.

उमेदवाराने युजर नेम व पासवर्ड ची नोंद करून लॉग-इन केल्यानंतर अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाच्या लिंक वर क्लिक करावे. त्या कार्यालयांतर्गत उपलब्ध जाहीराती "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या संदेशासह दाखविल्या जातील.

क्लिक केल्यानंतर आपण जाहीरातीत नमूद शैक्षणीक पात्रता /अनुभव / इतर बाबीची पूर्तता करीत असल्यास आपला अर्ज स्विकारल्या जाईल, अन्यथा आपला अर्ज दाखल न होण्याचे कारण दाखविले जाईल.

ज्या उमेदवारांना इंटरनेट व्दारे स्वत: अर्ज भरावयाचा नसेल, असे उमेदवार महा ई-सेवा केंद्रा मार्फत आपला अर्ज करू शकतात. त्याच वेळी उमेदवाराकडून परिक्षा शुल्क व रू.२२.९१ ऐवढी रोख रक्कम घेतली जाईल. उमेदवारांना पैसे भरण्याची पावती (Receipt) महा ई-सेवा केंद्रा तर्फे देण्यांत येईल. या सुविधेमध्ये आवेदन अर्ज भरणे व पैसे भरल्यानंतर पैसे भरल्याची पावती देणे याचा समावेश असेल. फोटो/स्वाक्षरी स्कॅन किंवा अर्जाच्या प्रिंट करीता स्वतंत्र रक्कम केंद्र चालकाडून आकारली जाईल. स्वत: ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणारे उमेदवार कार्यालयाने निश्चित केलेले परिक्षा शुल्क खालील पध्दतीने भरू शकतील.

**१३.५ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता उमेदवारांनी खालील नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा:-**

(१) भारतीय स्टेट बँकेत चलनाव्दारे (2) नेट बँकींग (3) डेबीट कार्ड (4) क्रेडीट कार्ड.

(२) युजर नेम व पासवर्ड ची नोंद करून लॉग-इन केल्यानंतर मुख्य पृष्ठाच्या वरील भागातील "माझे खाते" या लिंक वर क्लिक करावे. (2) "माझे खाते" या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नांव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्याच्या /न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "Unpaid" असे लिहीलेले असेल, त्या ठिकाणी "Pay Now" अशी लिंक उपलब्ध असेल. (3) "Pay Now" या लिंक वर क्लिक केल्यानंतर दोन पर्याय उपलब्ध होतील (1) ऑनलाईन पेमेंट (2) चलनाव्दारे (4) उमेदवार क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड अथवा नेट बँकींच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करू शकतील. उपरोक्त कार्यवाही, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील. (5) उमेदवाराने चलनाव्दारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बॅकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. (6) चलनाव्दारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बँक उमेदवाराकडून परिक्षा शुल्क व्यतिरिक्त नियमानुसार सेवा शुल्क आकारेल. अशा प्रकारे उमेदवारास चलनाव्दारे शुल्क भरतांना परिक्षा शुल्क + बँकेचे सेवा शुल्क भरावे लागतील (7) ज्या उमेदवाराना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरावयाचे आहे. असे उमेदवार अर्ज् सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारानी त्यापूढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

(३) उमेदवाराने प्रिंट चलन (Print Challan) या बटणावर क्लिक करुन चलन प्रिंट करावे. या प्रिंट केलेल्या चलनावर उमेदवाराने त्याच्या प्रवर्गानुसार परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वरील प्रमाणे नमूद केलेल्या विहीत मुदतीच्या आत भरणे आवश्यक राहील. अर्ज भरल्यानंतर दोन तासानंतर शुल्क भरता येईल. याची एक प्रत उमेदवाराने स्वत:कडे जपून ठेवावी.

**किंवा**

(४) उमेदवारांनी इंटरनेट बँकिंग अथवा क्रेडिट / डेबिट कार्ड द्वारे त्यांच्या प्रवर्गानुसार परीक्षा शुल्क विहित मुदतीच्या आत भरावे.

(५) फी भरल्यानंतर उमेदवाराने "अर्ज भरा"या लिंकवर क्लिक करुन, आपला उर्वरित अर्ज भरुन पूर्ण करावा. अर्ज भरताना उमेदवाराने स्वत:चा पासपोर्ट साईजमधील फोटो व सही अपलोड करणे आवश्यक आहे. माहिती पूर्ण भरल्यानंतर उमेदवाराने अर्जाची प्रिंट स्वत: काढावी व कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करण्यासाठी जतन करुन ठेवावी.

(६) विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

(७) उमेदवाराची ऑनलाईन परिक्षा /व्यावसायीक ऑनलाईन परिक्षेचे ठिकाण निश्चित झाल्यानंतर परिक्षेपूर्वी सात दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश पत्र त्याच्या "माझे खाते" मध्ये उपलब्ध करून देण्यांत येईल. त्याची प्रत उमेदवाराने परिक्षेपूर्वी डाऊनलोड करून घेणे व परिक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

(८) विहीत पध्दतीने अर्ज सादर करून शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे परिक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास ऑन लाईन चलनाची प्रत प्राप्त करून घेण्याची कार्यवाही **दि.७/८/२०१६** रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

(९) चलनाव्दारे परिक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेंट बँकेमध्ये **दि.८/८/२०१६** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहीत दिनांकानंतर परिक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही. तसेच परिक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

(१०) वरील सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच उमेदवार ऑनलाईन परीक्षा देण्यासाठी पात्र होईल. उमेदवाराच्या माहिती व मदतीकरिता **मे.महाऑनलाईन, लि. मुंबई** च्या कॉल सेंटरवरील उपलब्ध दूरध्वनी क्रमांकावर किंवा संकेतस्थळावरील फिडबॅकच्या सुविधेद्वारे योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.

(११) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना स्वत:चा मोबाईल नंबर व ई-मेल आयडी काळजीपूर्वक भरावा.

**१४. उमेदवारांच्या गुणवत्ता यादीनुसार नेमणूकीसाठी निवड झाल्यानंतर प्रत्यक्ष नेमणूक.**

**अ) संपूर्ण महाराष्ट्र राज्यात खालील सहा महसुली विभाग आहेत.**

(1) पुणे (2) मुंबई-ठाणे (3) नागपूर (4) अमरावती (5) औरंगाबाद (6) नाशिक

निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती वरील सहा महसुली विभागापैकी कोणत्याही एका विभागात शासनाचे परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/कार्या.१२ दि.८ मे २०१५ मधील तरतुदीनुसार करण्यांत येईल.

**ब) निवड व नियुक्ती झालेल्या उमेदवारांचा परिक्षेचा गुणानुक्रम हा त्यांच्या सेवा जेष्ठतेचा अनुक्रम राहील.**

**१५. परिक्षा केंद्र :-**

प्रत्यक्ष परिक्षा जाहीरातीच्या प्रारंभी नमूद केलेल्या संपूर्ण राज्यातील शक्यतो जिल्हा स्थानी घेण्यांत येईल परिक्षा केंद्र उमेदवाराना त्यांचे प्रवेश पत्रिकेवर नमूद करण्यांत येईल.

१५.१ प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशपत्र वर नमूद केलेल्या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेता येईल. सदर प्रवेशपत्र उमेदवाराने परीक्षेच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

१५.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने उपरोक्त प्रवेश प्रमाणपत्र आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वत:चे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील. **(उदा.आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना इ.)**

१६. विहित पध्दतीने अर्ज सादर करून शुल्क भरण्याची कार्यवाही उमेदवाराने संबंधित बँकांच्या कार्यालयीन वेळेत दिनांक **८/८/२०१६** पर्यंत करणे आवश्यक आहे.

**१७.** विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही. भरलेल्या परीक्षा शुल्काचा परतावा केला जाणार नाही.

**१८. ऑनलाईन परीक्षेचे स्वरुप:-**

| **अ. क्र.** | **संवर्ग** | **परीक्षेसाठीचे गुण** | | |
|---|---|---|---|---|
| | | **सर्वसाधारण ऑनलाईन परीक्षा** मराठी/गणित/बुध्दीमत्ता चाचणी/इंग्रजी/सामान्यज्ञान | **व्यावसायिक ऑनलाईन परीक्षा:-** स्थापत्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम | **एकूण गुण** |
| **१.** | **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) सरळसेवा गट-ब (अराजपत्रित)** | **८० (४० प्रश्न)** | **१२० (६० प्रश्न)** | **२००** |

१८.१. ऑनलाईन परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बुध्दीमत्ता चाचणी व गणित या विषयांवर वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न असतील. सदर अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जासमान राहील.

१८.२. व्यावसायिक ऑनलाईन परीक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या पदविका परीक्षेच्या दर्जासमान राहील.सदरहू व्यावसायिक ऑनलाईन परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील.

१८.३. उपरोक्त २०० गुणांच्या ऑनलाईन परीक्षेसाठी एकत्रितपणे सलग २ तासांचा कालावधी अनुज्ञेय राहील.

**१९. विशेष सुचना :-**

- हॉल तिकीट उमेदवाराने स्वत: डाऊनलोड करावयाचे आहे व छापील प्रत सोबत आणणे आवश्यक राहील.
- ऑनलाइन स्वरूपात निर्देशित परिक्षा केंद्रावरच परिक्षा होईल.
- हॉल तिकीटवर परिक्षा केंद्र व वेळ नमूद राहील.
- उमेदवारांना महा ऑनलाईन साईटवर मॉक टेस्ट (Mock Test) साठी एक लिंक पुरविण्यांत येईल त्यावर त्यांनी परिक्षेचा सराव करावा.

२०. ऑनलाईन अर्जामध्ये भरलेली माहिती आणि कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यात तफावत आढळल्यास उमेदवाराची निवड भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा उमेदवाराने मागितलेले सामाजिक/ समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिल करणे इत्यादी बदल/ सवलती नामंजूर करण्यात येतील.

सदर जाहीराती संदर्भात काही अडचण असल्यास उमेदवार महा ऑनलाईनचे दुरध्वनी क्रमांक ०२२-६१३१६४११ या हेल्पलाईनवर संपर्क करू शकतात.

**दिनांक : २१/०७/२०१६**
**ठिकाण : नागपूर**

**(अ.वा.सुर्वे)**
**अध्यक्ष**
**राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती, नागपूर**
**तथा कार्यकारी संचालक (विपाविमं), नागपूर**

- **परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**
- **प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास/ माहिती खोटी आढळल्यास अथवा एखादे प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवाराला त्याचवेळी पुढील प्रक्रीयेसाठी अपात्र केले जाईल.**

# महाराष्ट्र शासन
# जलसंपदा विभाग
## कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती, नागपूर
## कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) सरळसेवा परीक्षा- २०१६
## सर्वसाधारण सूचना

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्य स्तरीय सरळसेवा निवड समिती, नागपूर यांच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभाग/जलसंधारण विभागाच्या आस्थापनेवरील विविध कार्यालयातील **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या संवर्गातील** पदांची सरळ सेवा भरती करण्यात येत आहे.

शासनाच्या जलसंपदा विभाग/ जलसंधारण विभागातील **एकूण १२५६ पदांच्या** भरतीकरीता कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती, नागपूर यांच्यातर्फे **मे.महाऑनलाईन लि.मुंबई** यांच्यामार्फत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) सरळसेवा परीक्षा **२०१६ शनिवार,** दिनांक **२७/०८/२०१६** रोजी महाराष्ट्रातील **पुणे/ मुंबई-ठाणे/ नागपूर/अमरावती/ औरंगाबाद/ नाशिक** या **६ विभागातील शक्यतो खालील जिल्हास्थानी घेण्यात येईल.**

(१) अहमदनगर (२) अकोला (३) अमरावती (४) औरंगाबाद (५) बीड (६) भंडारा (७) बुलढाणा (८) चंद्रपूर (९) धुळे (१०) गडचिरोली (११) गोंदिया (१२) हिंगोली (१३) जळगाव (१४) जालना (१५) कोल्हापूर (१६) लातुर (१७) मुंबई शहर (१८) मुंबई उपनगर (१९) नागपूर (२०) नांदेड (२१) नंदुरबार (२२) नाशिक (२३) उस्मानाबाद (२४) परभणी (२५) पुणे (२६) रायगड (२७) रत्नागीरी (२८) सांगली (२९) सातारा (३०) सिंधुदुर्ग (३१) सोलापूर (३२) ठाणे (३३) वर्धा (३४) वाशिम (३५) यवतमाळ (३६) पालघर

सरळसेवा भरती प्रक्रीये अंतर्गत पदसंख्येत व आरक्षणामध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्य स्तरीय सरळसेवा निवड समिती, नागपूर** यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

**ऑनलाईन परीक्षेचे स्वरुप :**

| अ. क्र | संवर्ग | परीक्षेसाठीचे गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | **सर्वसाधारण ऑनलाईन परीक्षा:-** मराठी/गणित/बुध्दीमत्ता चाचणी/इंग्रजी/सामान्यज्ञान | **व्यावसायिक ऑनलाईन परीक्षा:-** स्थापत्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम | **एकूण गुण** |
| **१.** | **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) सरळसेवा गट-ब (अराजपत्रित)** | **८०<br>(४० प्रश्न)** | **१२०<br>(६० प्रश्न)** | **२००** |

१. ऑनलाईन परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बुध्दीमत्ता चाचणी व गणित या विषयांवर वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न असतील. सदर ऑनलाईन परीक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जासमान असेल.

२. व्यावसायिक ऑनलाईन परीक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या पदविका परीक्षेच्या दर्जासमान राहील. सदरहू व्यावसायिक ऑनलाईन परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील.

३. उपरोक्त २०० गुणांच्या ऑनलाईन परीक्षेसाठी एकत्रितपणे २ तासांचा कालावधी अनुज्ञेय राहील.
ऑनलाईन अर्जामध्ये भरलेली माहिती व कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यात तफावत आढळल्यास उमेदवाराची निवड भरती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द होवू शकेल अथवा उमेदवाराने मागीतलेले सामाजिक / समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिल करणे इत्यादी बदल/ सवलती नामंजूर करण्यात येतील.

**सर्वसाधारण अर्हता:-**

१) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र अर्जदाराकडे असणे आवश्यक आहे. अर्जदाराकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.रिपभ/ प्र.क्र.६६/२०११/ई-१०, दिनांक २७ जून, २०११नुसार अर्जदाराकडे महाराष्ट्र राज्यात जन्म झाल्याबाबतचा पुरावा असणे आवश्यक आहे.

२) वयोमर्यादेसाठी उमेदवाराचे दिनांक **७/८/२०१६** रोजीचे वय विचारात घेतले जाईल.

- दिनांक **७/८/२०१६** रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली असावी.

**उच्च वयोमर्यादा खालीलप्रमाणे शिथिल करण्यात येईल :-**

- खुल्या प्रवर्गातील निवडीसाठी उमेदवाराची वयोमर्यादा कमाल ३८ वर्षे .
- महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत. (वयाच्या ४३ वर्षांपर्यंत)
- विकलांग उमेदवारांच्या बाबतीत वयाच्या ४५ वर्षांपर्यंत.
- पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत. (मात्र कमाल वयोमर्यादा ४३ वर्षांपर्यंत)
- शासकीय सेवेतील कर्मचारी यांचेसाठी वयाच्या ४५ वर्षांपर्यंत.
- विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.
- वयोमर्यादा शिथिलतेबाबत कोणतीही एक सवलत (अधिकतम) लागू होईल.

**निवडीसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता :-**

१) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण व

२) सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पाटबंधारे विभाग यातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)गट-'ब' अराजपत्रित पदांचे सेवाप्रवेश (सुधारणा) नियम १९९८ नुसार शासनमान्य तीन वर्षे कालावधीची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदविका (Diploma in Civil Engineering) अथवा "अंशकालीक" किंवा "दूरशिक्षण पदविका" म्हणजे जी तीन वर्षे कालावधीच्या स्थापत्य अभियांत्रिकी पदविकेशी समतुल्य आहे अशी, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी मान्यता दिलेली पदविका.

३) "समतुल्य अर्हता" यामध्ये मान्यताप्राप्त विद्यापीठाकडून/महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या खालीलप्रमाणे पदविका (कालावधी ३ वर्ष)

- सिव्हील व रुरल इंजिनिअरिंग मधील पदविका
- सिव्हील इंजिनिअरिंग आणि रुरल कन्स्ट्रक्शन मधील पदविका
- ट्रान्सपोर्टेशन इंजिनिअरिंग मधील पदविका
- कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी मधील पदविका

४) **मराठी/ हिंदी भाषेचे ज्ञान आवश्यक:-** माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी/ हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी/ हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५) **संगणक अर्हता:-** MS-CIT ची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तथापि शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सामान्य् प्रशासन विभाग) विभाग क्र.मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९ दि.४.२.२०१३ मध्ये नमूद केलेल्या संगणक /माहिती तंत्रज्ञान विषयक ८६ प्रमाणपत्रापैकी कोणतेही एक प्रमाणपत्र धारक असावा. (सदर शासन निर्णय सोबत संलग्न आहे.) जे उमेदवार संगणक परिक्षा उत्तीर्ण नसतील अशा उमेदवाराच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचे आत संगणक परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील, अन्यथा त्यांची सेवा आपोआप समाप्त होईल.

६) **उमेदवाराने शैक्षणिक व इतर सर्व अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे दिनांक ७/८/२०१६ रोजी धारण केली असली पाहिजेत. त्यानंतरच्या दिनांकाची प्रमाणपत्रे ग्राह्य धरली जाणार नाहीत.**

**आरक्षण:-**

१) **मागासवर्गाचे आरक्षण:-**

- मागासवर्गीय आरक्षण महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार राहील.
- वि.जा.(अ), भ.ज.(ब), वि.मा.प्र.,भ.ज.(क), भ.ज.(ड) व इ.मा.व. या मागासवर्गासाठीच्या आरक्षणाबाबतच्या तरतुदी शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी-१०९४/प्र.क्र.८६/ मावक-५, दिनांक १६ जून, १९९४ नुसार आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार राहील.
- जातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग ( जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम-२००० मधील तरतुदींनुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.
- शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.एसटीसी-१६९६/प्र.क्र.३४/का-१०, दि.७ मार्च, १९९६आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी आदेश काढून विहित केलेल्या नमुन्यात अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
- शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.१२०/मावक-५, दिनांक १ नोव्हेंबर, २००१ तसेच शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२००६/ प्र.क्र.१५/मावक-५,दिनांक ३० जून, २००६ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी आदेश काढून विहित केलेल्या नमुन्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागावर्गीय व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
- महिला उमेदवारांच्या बाबतीत शासन पत्र, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२००४/प्र.क्र.६८७/मावक-५, दिनांक २९ ऑक्टोबर, २००४ मधील आदेशानुसार निर्गमित करण्यात आलेली विवाहापूर्वीचे नाव अंतर्भूत असलेली क्रिमीलेअर मध्ये मोडत नसल्याबाबतची प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येतील.
- शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.एसटीसी-१६९६/ प्र.क्र.३४/ का-१०, दि.७ मार्च, १९९६ नुसार अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना तसेच, शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र.बीसीसी-१०/ २००१/ प्र.क्र.१२० / मावक-५, दिनांक १ नोव्हेंबर, २००१ नुसार अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी, तसेच ज्या जातींना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागते, असे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे :-

  (एक) संबंधित उपविभागीय अधिकारी (महसूल),

  (दोन) उपजिल्हाधिकारी किंवा

  (तीन) जिल्हाधिकारी.

  उपरोक्त सक्षम प्राधिकाऱ्यांनी जातीच्या प्रमाणपत्रावर अन्य कोणताही शिक्का न मारता उपविभागीय अधिकारी (महसूल), उपजिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी असा शिक्का मारुन जातीचे प्रमाणपत्र निर्गमित केले असणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही प्रकारे निर्गमित केलेले प्रमाणपत्र वैध समजले जाणार नाही.
- शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सीबीसी-१०९६/ प्र.क्र.४८/ मावक-५, दिनांक १३ सप्टेंबर, १९९६ नुसार तालुका दंडाधिकारी यांनी दिनांक ३ जून, १९९६ पूर्वी प्रदान केलेले जातीविषयक प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

- शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सीबीसी-१०९४/ प्र.क्र.८६/ मावक-५, दिनांक २२ नोव्हेंबर, १९९५ तसेच शासनपत्र सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/ २००६/प्र.क्र.१६२/ मावक-५, दिनांक १८ एप्रिल, २००६ मधील आदेशानुसार ज्या व्यक्तींच्या नावे जातीचे प्रमाणपत्र असेल ती व्यक्ती व त्या व्यक्तीचे कुटुंब क्रिमीलेअर मध्ये मोडत नसल्याचे व धारकाच्या नांवाने सर्वसाधारण रहिवास प्रमाणपत्र प्रमाणित करणे आवश्यक आहे.
- महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असलेल्या स्थलांतरित मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्रमांक सीबीसी-१०८५/२६३०४/(२१९९)/बीसीडब्ल्यू-५, दिनांक ६ ऑक्टोबर, १९८६ मधील आदेशानुसार निर्गमित करण्यात आलेली प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येतील.
- जातीच्या दाखल्यामध्ये पुढील बाबी स्पष्टपणे नमूद असणे आवश्यक आहे :-
  (१) जात स्पष्टपणे लिहिलेली असावी, ती संक्षेपात्मक असू नये.
  (२) जातीचे वर्गीकरण जसे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्याजमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग स्पष्टपणे नमूद करावे.
  (३) जातीचे प्रमाणपत्र विहित नमुन्यात असावे.
  (४) प्रमाणपत्रामध्ये ज्या शासकीय आदेशान्वये ती जात मागासवर्गीयाच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आली असेल, त्या आदेशाचा क्रमांक व दिनांक नमूद केलेला असावा आणि ती व्यक्ती सक्षम प्राधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात सर्वसाधारण रहिवासी असल्याचा स्पष्ट उल्लेख असावा.
- मागासवर्गीय उमेदवारांनी ते महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याचे प्रमाणपत्र स्वत:च्याच नावाचे सादर करणे आवश्यक आहे.
- जातीच्या प्रमाणपत्रात उमेदवार आणि त्यांचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात सर्वसाधारण वास्तव्य (Ordinarily Reside(s)) असल्याची तरतूद करण्यात आली असेल तर अशा प्रकरणी महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याबाबतचा दाखला सादर करणे उमेदवारांस सर्वसाधारणपणे बंधनकारक राहणार नाही. भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५० च्या कलम- २० नुसार सर्वसाधारण वास्तव्याचा अर्थ लावला जाईल.
- मागासवर्गातील असल्याचा दावा सांगणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत विहित नमुन्यातील आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या प्रती (आवश्यक प्रमाणपत्राचे नमुने परिशिष्टांमध्ये दिले आहेत) प्रथम कागद पडताळणीच्या वेळी व नंतर नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
- विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) व इतर मागासवर्गाचा दावा करण्याऱ्या उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नाहीत असे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबतच्या प्रमाणपत्राच्या प्रती प्रथम कागद पडताळणीच्या वेळी व नंतर नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. असे न केल्यास आणि विहित प्रमाणपत्रांच्या प्रती सादर न केल्यास अशा उमेदवारांचा विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) किंवा इतर मागासवर्गाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही.
- उन्नत व प्रगत गटामध्ये मोडणाऱ्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) किंवा इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांनी अमागास उमेदवारांप्रमाणे आवश्यक संपूर्ण परीक्षा शुल्क पाठविणे आवश्यक आहे त्यांना खुल्या गटातील समजण्यात येईल. तसेच ते वयोमर्यादेतील सवलतीसह कोणत्याही सवलतीस पात्र समजले जाणार नाहीत.

२) **महिलांसाठीचे आरक्षण:-**

- महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.
- महिलांच्या आरक्षित पदांच्या लाभाकरिता उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा.

- महिलांचे आरक्षण हे त्या त्या प्रवर्गांसाठीच समांतर आरक्षण राहील. तथापि भरतीच्या वर्षात मागासवर्गीय महिलांकरिता आरक्षित पदांसाठी त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत, तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरूष उमेदवारांमधून भरण्यात येईल.
- खुल्या संवर्गातील महिलांसाठी आरक्षित असलेल्या जागेवर नियुक्तीकरिता त्या संवर्गातील योग्य महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या जागा अराखीव समजण्यात येतील.
- खुल्या संवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/ कुटुंबातील महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.
- खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी त्या क्रिमीलेअर प्रवर्गातील महिला नसल्याचे अर्जात नमूद करणे आवश्यक आहे.
- खुल्या प्रवर्गातील महिला उन्नत अथवा प्रगत व्यक्ती / गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचा प्रमाणपत्राचा नमुना सोबतच्या परिशिष्टामध्ये दिलेला आहे.
- शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सी.बी.सी. -१०९८/प्र.क्र.१५१/मावक-५, दिनांक ७ मे, १९९९ अन्वये शासनाने आंतरजातीय विवाह केलेल्यांना मिळणाऱ्या मागासवर्गाच्या सवलती/ फायदे रद्द केले आहेत. त्यानुसार आंतरजातीय विवाह केलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करताना आवश्यक ती दक्षता घ्यावी.
- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही१०९७/प्र.क्र.३१/९८/१६अ, दिनांक १६ मार्च, १९९९ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार महिला आरक्षणाबाबत कार्यवाही करण्यात येईल.

३) **अपंगांसाठीचे आरक्षण:-**

- संबंधित पदाला अपंग आरक्षण लागू करण्याबाबत शासनाने जारी केलेल्या शासन आदेशातील अपंग प्रवर्गानुसारच प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) सरळसेवा भरतीपरीक्षेकरीता खालील अपंग प्रवर्गात मोडणारे उमेदवार ऑनलाईन अर्ज करण्यास पात्र राहतील.:-

  (१) OA = One arm affected

  (२) OL = One leg affected

  (३) HH = **Hearing Handicapped**

  **अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा व वयोमर्यादेतील सवलतीचा लाभ मिळविण्यासाठी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे.**

  **फक्त कायम स्वरुपाचे अपंगत्व असलेल्या उमेदवारांनाच अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचे व वयोमर्यादेतील सवलतींचे फायदे देय असतील. तात्पुरत्या स्वरुपातील अपंगत्वाचे प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना अपंग व्यक्तींसाठी असलेले कोणतेही फायदे देय नाहीत.**

  **उपरोक्त अपंग प्रवर्गानुसार विहित नमुन्यातील प्रमाणपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणाऱ्या उमेदवारांचाच विचार करण्यात येईल.**
- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अपंग १००३/ प्र. क्र. १२७/२००३/ १६-अ, दिनांक ६ मे, २००४ मधील आदेशानुसार उमेदवार ज्या जिल्ह्यातील सर्वसाधारण रहिवासी असेल त्या जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या संबंधित विषयातील वैद्यकीय तज्ञांच्या मंडळाचे अपंगत्वाचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र आधारभूत धरण्यात येईल.
- सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५० च्या कलम २० नुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.
- अपंग व्यक्तीसाठी आरक्षित पदावर नियुक्तीकरिता संबंधित व्यक्तीने त्या पदासाठी असलेली विहित अर्हता धारण करणे आवश्यक आहे. तसेच, त्या पदावर काम करण्यास तो सक्षम असला पाहिजे. सदर अपंग उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा कसे याची तपासणी नियुक्तीपूर्वी वैद्यकीय मंडळाकडून शासनामार्फत करुन घेण्यात येईल.

- शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक अपंग-२००७/ प्र. क्र. ६१/ सुधार-३, दिनांक २० एप्रिल, २००७ व शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक न्याय-२००७/ स.न्या/ प्र.क्र.१०३/ (भाग-३)/ १६-अ, दिनांक १९ ऑक्टोबर, २००७ अन्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार अपंगांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर सरळसेवेने भरती करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता गुणवत्ताक्रमानुसार प्रथम त्याची भरती करण्यात येईल व भरती केल्यानंतर सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल, त्या सामाजिक प्रवर्गात उमेदवारास सामावून घेण्यात येईल.

४) **अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंचे आरक्षण :-**

- अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंचे आरक्षण शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र. ६८/क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल, २००५, दिनांक १८ जून, २००६, दिनांक २१ जून, २००६, तसेच क्रमांक संक्रीआ-२००७/ (प्र.क्र.३२९/०७)/क्रीयुसे-२, दिनांक ११ जुलै, २००१, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक संक्रीआ-१००६(प्र.क्र.१८२/०६)/क्रीयुसे-२, दिनांक ६ मे, २००८, क्रमांक क्रीअसु-१९०८/(प्र.क्र.३९४/०८)/क्रीयुसे-२, दिनांक २१ ऑगस्ट, २००८आणि तद्नंतर यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलल्या आदेशानुसार राहील.
  - **क्रीडाविषयक अर्हता:-** खेळाडूंसाठी आरक्षित पदांवर नियुक्ती देण्यासाठी खेळाडूने क्रीडाविषयक क्षेत्रात खालीलप्रमाणे कामगिरी केलेली असावी.
    - **गट-ब साठी अर्हता:-**

(एक) सदर पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये महाराष्ट्रातर्फे प्रतिनिधित्व करताना राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू;

(दोन) सदर स्पर्धा या संबंधित खेळाच्या भारतीय ऑलिम्पिक समितीशी संलग्न असलेल्या राष्ट्रीय फेडरेशनने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा भारतीय ऑलिम्पिक समितीने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात;

(तीन) उपरोक्त स्पर्धांव्यतिरिक्त असलेल्या स्पर्धा या मान्यताप्राप्त खेळांच्या असून राष्ट्रीय स्तरावरील भारतीय ऑलिम्पिक समितीच्या मान्यताप्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात. यामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंची निवड ही राज्य संघातून झालेली असावी;

(चार) भारतीय खेळ प्राधिकरण यांनी आयोजित केलेल्या ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धांमधील राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त किंवा सुवर्ण, रौप्य, कांस्य पदकप्राप्त खेळाडू असावा.

**तथापि प्रत्येक गटात नियुक्तीसाठी स्पर्धा असेल तर वरिष्ठ प्राविण्य प्राप्त उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.**

**निवड प्रक्रीया व नियुक्ती:-**

निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर (निवड प्रक्रीया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, ऑनलाईन अर्जात दिलेली माहिती/ अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल, तसेच एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून वगळण्यात येईल व नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येवून त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल. उमेदवार शासकीय सेवेत असल्यास त्यास बडतर्फ करण्यात येईल.

वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या जलसंपदा विभागाच्या सूचनेनुसार वाढ किंवा घट करण्याचे अधिकार **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती, नागपूर** यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगित झाल्यास अथवा रद्द झाल्यास त्या बाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचे स्वरुप,

पदांची संख्या, समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण या बाबत बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे तसेच सेवाभरती प्रक्रीयेत बदल करणे या बाबतचे **सर्व अधिकार कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्य स्तरीय निवड समिती, नागपूर** स्वत:कडे राखून ठेवत आहे. **भरती प्रक्रीयेसंदर्भात उद्भवणारे वाद, तक्रारी इत्यादी बाबत सदर समितीचा निर्णय अंतिम राहील.**

नियुक्ती झाल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील तरतुदी उमेदवारांस बंधनकारक राहतील.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदली करीता महाराष्ट्र बदली अधिनियम-२००५ मध्ये नमूद करण्यात आलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल. विनियम व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.२०१०/१०/१२ दिनांक ०३ जून, २०११ मधील निर्देशानुसार अन्यत्र बदलीच्या तरतूदी लागू राहतील.

वित्त विभाग शासन निर्णय क्र.अनियो/१०/०५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारास नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. तथापि, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना [म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४]आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक २८ मार्च, २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक ०१ जुलै, २००५अन्वये विहित केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये शासनाने गट अ,ब,क आणि ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून **विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य** आहे.

शासकीय सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर संबंधित उमेदवाराने सहा महिन्याच्या आत वैद्यकिय दृष्ट्या सक्षम असल्याचे जिल्हा शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्याकडून शासकीय सेवेत काम करण्यास पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र नियुक्ती झालेल्या कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे.

शासकीय सेवेमध्ये संबंधीत उमेदवाराची नियुक्ती त्याचे **पूर्वचारित्र्य व वर्तणूक** (पोलीस चौकशी) यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील व तसा **तपासणी अहवाल** आक्षेपार्ह असल्यास संबंधित उमेदवारास नियुक्ती दिली जाणार नाही व अशा प्रकरणी सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक चापअ-१०१२/ प्र. क्र. ६३/ १६-अ दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ नुसार गठीत केलेल्या समितीच्या निर्णयानुसार व परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल. तसेच, यापूर्वीच संबंधित उमेदवारास नियुक्ती दिली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतून काढून टाकण्यात येईल.

शासनाच्या धोरणाअंती उमेदवाराची सेवा एक महिन्याची नोटीस देऊन केव्हाही समाप्त करण्यात येईल.

**नियुक्त होणाऱ्या उमेदवारास नियुक्ती देण्यांत आलेल्या महामंडळात/ जलसंधारण विभागात/प्रादेशिक विभागात किमान ९ वर्ष सेवा करणे बंधनकारक आहे.** याबाबतचे शपथपत्र नियुक्त होणाऱ्या उमेदवारांनी नियुक्तीच्यावेळी देणे आवश्यक राहील.

उमेदवाराने नियुक्ती नंतर शासन निर्णय क्रमांक टीआएन-०५१४/प्र.क्र.७/१४/१८-ब दिनांक २४ एप्रिल, २०१५ नुसार **किमान पाच वर्षे शासन सेवा करणे बंधनकारक** आहे, तसेच रुजू होताना **रु.३.०० लक्ष रकमेचे विहीत नमुन्यातील बंधपत्र** ही सादर करणे आवश्यक आहे.

**अर्ज करण्याची पध्दत:-**

- उमेदवाराने जाहिरात काळजीपूर्वक वाचावी. अर्ज फक्त **ऑनलाईन** पध्दतीनेच स्विकारले जातील.
- ऑनलाईन अर्ज http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

- प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.
- पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज दिनांक **२१/७/२०१६** ते दिनांक **७/८/२०१६** या कालावधीतच http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील.
- **http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या "सर्वसाधारण सूचना" उपलब्ध आहेत. त्याचे काळजीपूर्वक वाचन करुन ऑन लाईन अर्ज सादर करावा.**
- उमेदवाराने जाहिरात व सर्वसाधारण सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात. ऑनलाईन अर्ज करण्यासाठी उपरोक्त संकेतस्थळावर "Apply Online" या लिंकवर क्लिक करुन सर्वप्रथम प्राथमिक माहिती भरावी. यानंतर रजिस्टर (Register)या बटणावर क्लिक करुन अर्जाची नोंदणी करावी. अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. आवश्यक माहिती भरल्यानंतर नोंदणी झाल्यावर संगणक प्रणाली तुमचा लॉगिन आयडी आणि पासवर्ड निर्माण करुन तुम्हाला तुमच्या स्क्रिनवर दाखवेल. याची प्रिंट काढण्याची सुविधाही उपलब्ध आहे.
- **परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता उमेदवारांनी खालील नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा:-**
- उमेदवारास कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्य स्तरीय सरळसेवा निवड समिति, नागपूर यांनी निश्चित केलेले परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) मध्ये चलनाद्वारे जमा करता येईल.
- तसेच इंटरनेट बँकिंग, क्रेडिट / डेबिट कार्ड या सुविधेद्वारे देखील परीक्षा शुल्क जमा करता येईल.
- उमेदवाराने प्रिंट चलन (Print Challan) या बटणावर क्लिक करुन चलन प्रिंट करावे. या प्रिंट केलेल्या चलनावर उमेदवाराने त्याच्या प्रवर्गानुसार परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वरील प्रमाणे नमूद केलेल्या विहीत मुदतीच्या आत भरणे आवश्यक राहील व याची एक प्रत उमेदवाराने स्वत:कडे जपून ठेवावी.
- किंवा उमेदवारांनी इंटरनेट बँकिंग अथवा क्रेडिट / डेबिट कार्ड द्वारे त्याच्या प्रवर्गानुसार परिक्षा शुल्क विहित मुदतीच्या आत भरावे.
- फी भरल्यानंतर उमेदवाराने "अर्ज भरा" या लिंकवर क्लिक करुन, आपला उर्वरित अर्ज भरुन पूर्ण करावा. अर्ज भरताना उमेदवाराने स्वत:चा पासपोर्ट साईजमधील फोटो व सही अपलोड करणे आवश्यक आहे. माहिती पूर्ण भरल्यानंतर उमेदवाराने अर्जाची प्रिंट स्वत: काढावी व कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करण्यासाठी जतन करुन ठेवावी.
- विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
- वरील सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच उमेदवार ऑनलाईन परीक्षा देण्यासाठी पात्र होईल. उमेदवाराच्या माहिती व मदतीकरिता **मे.महाऑनलाईन लि.मुंबई** च्या कॉल सेंटरवरील उपलब्ध दूरध्वनी क्रमांकावर किंवा संकेतस्थळावरील फिडबॅकच्या सुविधेद्वारे योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.
- उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना स्वत:चा मोबाईल नंबर व ई-मेल आयडी नोंदणी करतेवेळी काळजीपूर्वक भरावा.
- प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशपत्र संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेता येईल. सदर प्रवेशपत्र उमेदवाराने परिक्षेच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.
- परीक्षेच्या वेळी उमेदवाराने उपरोक्त प्रवेश प्रमाणपत्र आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वत:चे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील.
- विहित पध्दतीने अर्ज सादर करून शुल्क भरण्याची कार्यवाही उमेदवाराने संबंधित बँकांच्या कार्यालयीन वेळेत दिनांक **८/८/२०१६** पर्यंत करणे आवश्यक आहे.
- विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही. भरलेल्या परीक्षा शुल्काचा परतावा केला जाणार नाही.

**परीक्षा शुल्क :-** सदर भरतीप्रक्रीयेत खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क आकारले जाईल.

| | | |
|---|---|---|
| **अमागास** | :- | **रु. ७००/-** |
| **मागासवर्गीय** | :- | **रु. ३५०/-** |
| **विकलांग व्यक्ती** | :- | **रु. ३५०/-** |

**ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी सर्वसाधारण मार्गदर्शन व सूचना :-**

प्रस्तुत पदांकरीता अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रीयेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील. तसेच ई-मेल आयडीव मोबाईल संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती, नागपूर जबाबदार असणार नाही. अधिकृत संकेतस्थळाला भरती प्रक्रीयेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक, इत्यादी भरती प्रक्रीयेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. यासंबंधी कोणताही स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. दिनांक **२१/७/२०१६** ते दिनांक **७/८/२०१६** कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. उमेदवाराला अन्य कोणत्याही मार्गाने अर्ज सादर करता येणार नाही.

उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील. ऑनलाईन अर्जात एकदा भरलेली माहिती तद्नंतर बदलता येणार नाही.

उमेदवारांची परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार, कोणत्याही कागदपत्रांची पूर्व तपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे, या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती, नागपूर यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

उमेदवारांनी वेब-बेस्ड (web-based) ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करावी त्याशिवाय कागदपत्रांची पडताळणी होणार नाही याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख व विहित केलेल्या वेळेनंतर संकेतस्थळावसरुन ऑनलाईन अर्ज भरता येणार नाही.

अपात्र अर्जदारास त्यांच्या अपात्रतेबाबत स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.

वरील अटी, शर्ती, नियमांव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय,परिपत्रक,आदेश लागू राहील.

**ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी वेळापत्रक :**

| | | |
|---|---|---|
| **१** | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सुरु होण्याचा दिनांक | २१/७/२०१६ |
| **२** | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | ७/८/२०१६ |
| **३** | संगणकीय चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या शाखेमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | २१/७/२०१६ ते ७/८/२०१६ |
| **४** | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | २४/८/२०१६ |

| | | |
|---|---|---|
| ५ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | २७/८/२०१६ (संभाव्य) |

सदर जाहिरात जिल्हा रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्यविकास विभागाच्या **http://maharecruitment.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.
जाहिरातीमधे नमूद केलेले शासन निर्णय/ परिपत्रके या बाबतची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदासाठी निर्गमित केलेल्या जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून विहीत दिनांकाच्या मुदतीत फक्त ऑनलाईन पध्दतीने **http://maharecruitment.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावरुन आवेदन अर्ज मागविण्यात येत आहेत.
उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतांना खालील सविस्तर सर्वसाधारण सूचना विचारात घेवून काळजीपूर्वक अर्ज भरणे आवश्यक आहे.

ऑनलाईन अर्ज भरण्याच्या अनुषंगाने **http://maharecruitment.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर भरती प्रक्रीयेबाबतची अद्ययावत माहिती जाणून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
सरळसेवा भरती प्रक्रीयेच्या अनुषंगाने प्रवेशपत्र,ऑनलाईन परीक्षा, निकाल, कागदपत्रे छाननी व अंतिम गुणवत्ता यादी इत्यादी बाबतच्या विविध सूचना ह्या संकेत स्थळावरून प्रसिध्द केल्या जातील.याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही अथवा उमेदवाराने केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

विहीत अर्हता व वयोमर्यादा कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही. दिनांक ७/८/२०१६ रोजी विहीत अर्हता व वयोमर्यादा नसलेल्या उमेदवारांनी अर्ज करू नयेत.
अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळल्यास संबंधीत उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहील. चुकीच्या माहितीच्या आधारे उमेदवाराची नियुक्ती झाल्याचे निदर्शनास आल्यास तो तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील. त्याचप्रमाणे भारतीय दंड विधान संहिताचे कलम १९९ व २०० (२) प्रमाणे कारवाईस पात्र राहील.
निवड प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यातील वाद व तक्रारीबाबत निर्णय घेण्याचा अधिकार कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती, नागपूर यांचा राहील व समितीचा निर्णय अंतिम राहील.

**इतर अटी :**

परीक्षा केंद्राचा सांकेतांक क्रमांक, वेळ व दिनांक पात्र उमेदवारांना संकेतस्थळावर उपलब्ध होईल. परीक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. उमेदवारास परीक्षाकेंद्रावर स्वखर्चाने यावे लागेल.

गुणानुक्रमे कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी नेमून दिलेल्या दिनांकास संकेतस्थळावरुन कळविलेल्या कार्यालयाच्या ठिकाणी व्यक्तीश: उपस्थित राहणे अनिवार्य राहील. सर्व उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी ही पुणे मुख्यालयीच करण्यात येईल. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. छाननीअंती वरील प्रमाणपत्रांमधे त्रुटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास अथवा एखादे प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवाराला त्याचवेळी पुढील प्रक्रीयेसाठी अपात्र केले जाईल.
नियुक्तीसाठी अंतिमत: पात्र ठरलेल्या उमेदवारांची पुन:श्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, आवश्यक असल्यास अद्ययावत नॉनक्रिमीलेअर दाखला तसेच आवश्यक ती मूळ प्रमाणपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतीं (साक्षांकन हे केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी / पोस्टमास्तर / प्राचार्य व याबाबत प्राधिकृत सक्षम अधिकाऱ्यांनीच केलेले असावे) यांची छाननी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांचे स्तरावर केली जाईल. तसेच अंतिम निवडीच्या वेळी सादर केलेल्या प्रमाणपत्रांपैकी कोणतेही प्रमाणपत्र अग्राह्य असल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

जिल्हा रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्यविकास कार्यालयात नांव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहीत नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

शासकीय/ निमशासकीय कर्मचारी-शासकिय/निमशासकिय सेवेत असलेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच सादर करावा. त्याचवेळी त्यांनी अर्ज केलेल्या पदाचे/ परीक्षेचे नाव, जाहिरातीचा संदर्भ व अर्ज स्वीकारण्यासाठी निवड समितीने विहीत केलेला अंतिम दिनांक इत्यादी तपशील आपल्या विभाग/ कार्यालय प्रमुखांना कळवावा आणि आपला अर्ज विचारात घेतला जाण्यास कोणताही आक्षेप असल्यास अर्ज स्वीकारण्याच्या अखेरच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत तसे **मे.महाऑनलाईन लि.मुंबई** यांना कळविण्याची विनंती आपल्या विभाग/ कार्यालय प्रमुखांना करावी. अर्ज विचारात घेतला जाण्यास हरकत नसल्यास तसे कळविण्याची आवश्यकता नाही, हे ही त्यांना कळवावे.

जात वैधता-जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर, २०११अन्वये ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील व त्याच्या पोहोच पावतीची प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक राहील. जात पडताळणी समितीने उमेदवाराचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवले तर नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येतील व उमेदवाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन-सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००-प्र. क्र.१७ (२०००) / १२, दि.२८ मार्च २००५नुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन विहीत करणारे महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील तरतुदी व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२००० / प्र. क्र. १७ / २००० / १२, दिनांक १ जुलै,२००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे अर्जदाराने विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापन साध्या कागदावर हस्तलिखीत/टंकलिखीत करुन प्रथम कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नंतर नियुक्तीचे वेळी सादर करणे अनिवार्य आहे. अविवाहीत अर्जदारांनीही विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापन पडताळणीच्यावेळी व नियुक्तीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**निवड प्रक्रीया व नियुक्ती :**

ऑनलाईन परीक्षेनंतर आदर्श उत्तरपत्रिका नमुना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर उत्तरपत्रिकेबाबत काही आक्षेप असल्यास, उमेदवारांनी उत्तरपत्रिका प्रसिध्द झाल्यापासून ०४ दिवसाच्या आत संकेतस्थळावर दिलेल्या सुविधेद्वारेच आपले आक्षेप निवड समितीकडे सादर करावेत. अन्य कोणत्याही मार्गाने प्राप्त होणाऱ्या आक्षेपांचा/निवेदनाचा विचार करण्यात येणार नाही.

उमेदवारांकडून प्राप्त होणारे आक्षेप व त्याबाबतचे पुरावे याची छाननी करून आवश्यकतेनुसार सुधारित आदर्श उत्तरपत्रिका संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर उत्तरपत्रिकेबाबत नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

परीक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांचा निकाल त्यांना मिळालेल्या गुणांच्या आधारे अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केला जाईल.

या निकालाच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण निहाय अंतरीम गुणवत्ता यादी अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल. गुणवत्ता यादीतील निवड झालेल्या उमेदवारांचा उपलब्ध पदांनुसार राज्यात कोठेही नियुक्ती देण्यांत येईल.

अंतरीम गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भूत उमेदवारांसाठी कागदपत्रे पडताळणी कार्यक्रम प्रसिध्द केला जाईल. अशा उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या सूचनांनुसार त्यांना कागदपत्र छाननीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास वेळेवर स्वखर्चाने ठरवून दिलेल्या ठिकाणी मूळ कागदपत्रे व साक्षांकीत प्रतीसह व्यक्तीश: उपस्थित राहणे अनिवार्य राहील. सदर दिवशी, विहित वेळेत व ठिकाणी सदर उमेदवार कागदपत्र छाननीसाठी अनुपस्थित राहील्यास, अथवा अपुरे कागदपत्रे सादर केल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल. याबाबत कोणतीही विनंती/ तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कागदपत्र पडताळणी प्रक्रीयेअंती सादर केलेली कोणतीही प्रमाणपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

वरीलप्रमाणे गुणवत्ता यादीतील उमेदवारांची कागदपत्रांच्या छाननीनंतर गुणसंख्येच्या आधारे अंतिम निवड यादी तयार केली जाईल.

एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास खालील प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

ऑनलाईन परीक्षेच्या दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतरमागासवर्गीय व मागासवर्गीय उमेदवारांच्या मध्ये प्रथम अनुसूचित जमाती, नंतर अनुसुचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती), भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागासवर्ग या क्रमाने, त्यानंतर शारीरिकदृष्ट्या अपंग असलेले उमेदवार, त्यानंतर  वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल) वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

**अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्ती अधिकाऱ्यांकडे सर्व मूळ कागदपत्रे वैधता तपासणीसाठी सादर करणे अनिवार्य आहे. त्यानंतरच उमेदवाराचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.**

नियुक्तीचे ठिकाणी उमेदवारांना **स्वखर्चाने** रुजू होणे अनिवार्य आहे.

अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना सेवेत रुजू झाल्यानंतर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या पदासाठी आवश्यक व **विहीत केलेली विभागीय परीक्षा (जलसंपदा खात्याची) उत्तीर्ण** होणे अनिवार्य राहील.

सदर जाहीराती संदर्भात काही अडचण असल्यास उमेदवार महा ऑनलाईनचे दुरध्वनी क्रमांक ०२२-६१३१६४११ या हेल्पलाईनवर संपर्क करू शकतात.

**दिनांक :- २१/७/२०१६**
**ठिकाण :- नागपूर**

**(अ.वा.सुर्वे)**
**अध्यक्ष,**
**कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)**
**राज्यस्तरीय सरळसेवा निवड समिती, नागपूर**
**तथा कार्यकारी संचालक (अ.का.) (विपाविमं),**
**नागपूर**

संगणक अर्हता परीक्षेबाबत

महाराष्ट्र शासन
माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग
शासन निर्णय क्रमांकः मातंस २०१२ /प्र. क्र. २७७/३९
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०४ फेब्रुवारी, २०१३

वाचा :-

१) शासन अधिसूचना क्रमांकः सेप्रनि/१०९८/प्र.क्र.७/९८/१२ दि. २५/०१/१९९९

२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः प्रशिक्षण २०००/ प्र. क्र. ६१ /२००१/३९ दिनांक. ०७/०८/२००१

३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः प्रशिक्षण २०००/ प्र. क्र. ६१/२००१/३९ दिनांक. १९/०३/२००३

४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः मातंसं/नस्ती-०४/२२४/३९ दिनांक २६/०५/२००४

५) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः मातंसं/नस्ती-०७/प्र. क्र.७१/३९ दिनांक २१/०२/२००८

६) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, परिपत्रक क्र. रा.मं./पापुई/संगणक अभ्यासक्रम/७४१६ दि. १२/१२/२०११

प्रस्तावना :-

शासनाच्या दैनंदिन कामकाजात संगणकाचा तसेच माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे शासनाचे धोरण आहे. त्या अनुषंगाने क्र. २ वरील अधिसूचने अन्वये गट अ, ब, क मधील सेवकांना संगणक हाताळण्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीकोनातून शासकीय सेवकांनी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहेत. कोणते संगणक अर्हता प्रमाणपत्र शासकीय सेवकांनी सादर करावे याबाबत वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहे. संगणक हाताळणीचे ज्ञान अनिवार्य करण्याची अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर संगणक व माहिती तंत्रज्ञान या विषयात फार मोठी प्रगती झालेली आहे. त्या अनुषंगाने या विषयाचे महत्व ओळखून शासनाने संगणक आणि माहिती तंत्रज्ञान विषयाचे अभ्यासक्रम शालेय /

महाविद्यालयीन शिक्षणात समाविष्ट केलेले आहेत. या पार्श्वभूमीवर यापुढे शासकीय सेवेत येणारे उमेदवार हे शालांत परिक्षेत संगणक / माहिती तंत्रज्ञान विषय घेऊन उत्तीर्ण झालेले असतील ही बाब विचारात घेता यापूर्वीचे संगणक अर्हता परिक्षेबाबतचे क्र. ३,४,व ५ वरील शासन निर्णय अधिक्रमित करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णयः-

राज्य शासनाच्या गट अ, ब आणि क मधील कर्मचाऱ्यांना MSCIT या संगणकीय अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य आहे. तथापि, खाली नमुद केलेल्या संगणक / माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

१) D.O.E.A.C.C. / N.E.I.L.I.T. नवी दिल्ली चे प्रमाणपत्रधारक.

२) राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालेय अभ्यासक्रमाच्या इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी साठी माहिती तंत्रज्ञान विषय अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांना व इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी साठी माहिती तंत्रज्ञान, संगणक शास्त्र, कॉम्प्युटर टेक्निक व मल्टीमिडीया ॲंड इंटरनेट टेक्नॉलॉजी हे विषय अभ्यासून उत्तीर्ण.

३) केंद्रीय माध्यमिक शालेय शिक्षण मंडळाची इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी ची परीक्षा संगणक / माहिती तंत्रज्ञान हे विषय घेऊन उत्तीर्ण.

४) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या संगणक तंत्रशास्त्र (Computer Technology)/ संगणक अभियांत्रिकी (Computer Engineering) / माहिती तंत्रज्ञान (Information Technology) या विषयाचा राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा पदवी / पदवीका व संगणक उपाययोजन (Computer Application), संगणक उपाययोजन पद्धती व पृथक्करण (ADCSSAA) या पदव्युत्तर प्रगत पदविका (Advance Diploma), सर्व शासन मान्य विद्यापीठातील संगणक तंत्रशास्त्र (Computer Technology) / संगणक अभियांत्रिकी (Computer Engineering) / माहिती तंत्रज्ञान (Information Technology) या विषयाचा राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा पदवी / पदवीका व संगणक उपाययोजन (Computer Application), संगणक उपाययोजन प्रद्धती व पृथक्करण (ADCSSAA) या पदव्युत्तर प्रगत पदविका (Advance Diploma) उत्तीर्ण केलेले उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण.

५) व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळामार्फत चालविण्यात येणारे, परिशिष्ट - अ - मध्ये नमूद केलेले संगणक विषयी ८६ अभ्यासक्रमांचे प्रमाणपत्र पत्रधारक.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०२०४१६२३३७९१११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Chavan Pradip Girdhar
DN: CN = Chavan Pradip Girdhar, C = IN, S = Maharashtra, O = Govt. of Maharashtra, OU = Directorate of Information Technology
Reason: I am the author of this document
Location: Mantralaya
Date: 2013.02.04 16:53:41 +05'30'

(प्रदिप चव्हाण)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
४) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव,
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
७) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा) मुंबई,
८) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,
९) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
११) सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
१२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३) सर्व पोलीस आयुक्त
१४) सर्व विभागीय आयुक्त,
१५) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
१६) सर्व जिल्हाधिकारी,
१७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१८) सर्व नगरपालिका / परिषदांचे मुख्याधिकारी

१९) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,
२०) पहिला मजला, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण इमारत,
२१) सर्व मंत्रालयीन विभाग
२२) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण, मुंबई,
२३) मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
२४) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२५) निवड नस्ती प्रती (२)

Digitally signed by Chavan Pradip Girdhar
DN: CN = Chavan Pradip Girdhar, C = IN, S = Maharashtra, O = Govt. of Maharashtra, OU = Directorate of Information Technology
Reason: I am the author of this document
Location: Mantralaya
Date: 2013.03.04 16:04:27 +05'30'

## परिशिष्ट 'अ'

| Sr. No. | Course Name | Code No. | Duration |
|---|---|---|---|
| | COMPUTER GROUP (PART TIME) | | |
| १ | C.C.IN ELEMENTS OF COMPUTER ENGINEERING | १०११४८ | Six Month |
| २ | C.C.IN COMPUTER OPERATION WITH M.S.OFFICE | १०११०१ | Six Month |
| ३ | C.C. IN DESK TOP PUBLISHING (D.T.P.) | १०११०२ | Six Month |
| ४ | C.C. IN COMPUTERIZED ACCOUNTUING & OFFICE AUTOMATION | १०११०३ | Six Month |
| ५ | C.C. IN INFORMATION TECHNOLOGY | १०११०४ | Six Month |
| ६ | C.C. IN WEB PAGE DESIGNING | १०११०५ | Six Month |
| ७ | C.C. IN AUTO - CAD | १०११०६ | Six Month |
| ८ | C.C. IN MULTI-MEDIA ANIMATION TECHNOLOGY | १०११०७ | Six Month |
| ९ | C.C. IN COMPUTERIZED ACCOUNTING USING TALLY | १०११०८ | Six Month |
| १० | C.C.IN COMPUTER BASICS ( FOR BLIND ONLY) | १०११०९ | Six Month |
| ११ | C.C.IN NET WORKING | १०१११० | Six Month |
| १२ | C.C. IN CALL CENTRE MANAGEMENT | १०११११ | Six Month |
| १३ | C. C. IN COMPUTER DATA ENTRY OPERATOR | १०११२१ | Six Month |
| १४ | C.C. IN BASIC COMPUTER APPLICATION | १०११२२ | Six Month |
| १५ | C.C.IN GRAPHIC MULTIMEDIA ANIMATION | १०११२४ | Six Month |
| १६ | C.C. IN E-COMMERCE | १०११२० | Six Month |
| १७ | C. C. IN CYBER LAW | १०११४६ | Six Month |
| १८ | C.C.IN DATA BASE | १०११५२ | Six Month |
| १९ | C.C.IN BPO VOICE BUSINESS TRAINING | १०११५३ | Six Month |
| २० | C.C.IN BPO NON-VOICE BUSINESS TRAINING | १०११५४ | Six Month |

| Sr. No. | Course Name | Code No. | Duration |
|---|---|---|---|
| २१ | C.C.IN PRINT PUBLISHING | १०११५५ | Six Month |
| २२ | C. C. IN C & C++ | १०१११३ | Six Month |
| २३ | C.C. IN VISUAL BASIC | १०१११४ | Six Month |
| २४ | C.C. IN V.B. NET | १०१११५ | Six Month |
| २५ | C.C. IN ASP NET PROGRAMMING WITH V.B. NET | १०१११६ | Six Month |
| २६ | C. C. In Microsoft SQL Server २००० | १०१११७ | Six Month |
| २७ | C. C.IN BASIC COMPUTER PROGRAMMING | १०१११९ | Six Month |
| २८ | C.C.IN २D ANIMATION CLEAN UP | १०११२७ | Six Month |
| २९ | C.C.IN २D ANIMATION SKETCHING | १०११२८ | Six Month |
| ३० | C.C. IN GRAPHIC DESIGNING & VISUALIZATION | १०११२९ | Six Month |
| ३१ | C.C. IN PRE-FOUNDATION FOR २D ANIMATION | १०११३० | Six Month |
| ३२ | C.C. IN DESIGNING OF INTER ACTIVE MEDIA | १०११३१ | Six Month |
| ३३ | C.C. IN INTER ACTIVE MEDIA USING ANIMATION | १०११३२ | Six Month |
| ३४ | C.C. IN २D ANIMATION PROCESSING | १०११३३ | Six Month |
| ३५ | C.C. IN ३D ANIMATION PRODUCTION | १०११३४ | Six Month |
| ३६ | C.C.IN ३D ARCHITECTURE VISUALIZATION | १०११३५ | Six Month |
| ३७ | C.C. IN BASIC ANIMATION | १०११३६ | Six Month |
| ३८ | C.C.IN ADVANCE COMPUTERIZED ACCOUTING USING TALLY | १०१११२ | Six Month |
| ३९ | C.C. IN ADVANCED VB NET PROGRAMMING | १०१११८ | Six Month |
| ४० | C.C. IN WEB PUBLISHING | १०११२५ | Six Month |
| ४१ | C.C. IN ADVANCE ARCHITECTURE DESIGN | १०११२६ | Six Month |
| ४२ | C.C.IN SPECIALIZATION IN ANIMATION USING MAYA | १०११३९ | Six Month |
| ४३ | C.C. IN SPECIALIZATION IN LIGHTING AND RENDERRING USING MAYA | १०११४० | Six Month |
| ४४ | C.C. IN SPECIALIZATION ३ D COMPOSITING | १०११४१ | Six Month |

Digitally signed by Chavan Pradip Girdhar
DN: CN = Chavan Pradip Girdhar, C = IN, S = Maharashtra, O = Govt. of Maharashtra, OU = Directorate of Information Technology
Reason: I am the author of this document
Location: Maharashtra

| Sr. No. | Course Name | Code No. | Duration |
|---|---|---|---|
| | AND VISUAL EFFECTS USING MAYA | | |
| ४५ | C.C. IN SPECIALIZATION SPECIAL EFFECTS AND DYNAMIC USING MAYA | १०११४२ | Six Month |
| ४६ | C.C. IN SPECIALIZATION IN MODELING AND TEXTURING USING MAYA | १०११४३ | Six Month |
| ४७ | C.C. IN ARCHITECTURAL & CIVIL USING AUTO CAD | १०११३७ | Six Month |
| ४८ | C.C. IN MECHANICAL DRAFTING USING AUTO CAD | १०११३८ | Six Month |
| | COMPUTER GROUP (FULL TIME) | | |
| ४९ | C.C. IN COMPUTER NETWORKING | १०११४४ | Six Month |
| ५० | C.C. IN MULTI MEDIA & WEB PAGE DESIGNING | १०११४५ | Six Month |
| ५१ | C.C.IN E- ACCOUNTANCY & OFFICE MANAGEMENT | १०११४९ | Six Month |
| ५२ | C.C. IN MULTI MEDIA & CREATIVE DESIGNING | १०११५० | Six Month |
| ५३ | C.C. INFORMATION SYSTEM MANAGEMENT | १०११५१ | Six Month |
| ५४ | C.C.IN D.T.P. OPERATOR (FOR DUAF AND DUMB) | १०१२११ | One Year |
| ५५ | C.C. IN MULTIMEDIA AND INTERNET TECHNOLOGY | १०१२०३ | One Year |
| ५६ | C. C. IN COMPUTER SOFTWARE | १०१२०४ | One Year |
| ५७ | C.C. IN COMPUTER TECHNIQUES | १०१२०५ | One Year |
| ५८ | C.C. INFORMATION TECHNOLOGY & COMPUTER SYSTEM MAINTENANCE | १०१२०६ | One Year |
| ५९ | C.C. IN CALL CENTER ASSISTANT | १०१२०७ | One Year |
| ६० | C.C. IN DATA ENTRY OPEATOR & ANALYZER | १०१२०८ | One Year |
| ६१ | C.C. IN NETWORK TECHNICIAN | १०१२०९ | One Year |
| ६२ | C.C. IN COMPUTER SOFTWARE ENGINEER APPLICATION | १०१२१० | One Year |

Digitally signed by Chavan Pradip Giridhar
DN: CN = Chavan Pradip Giridhar, C = IN, S = Maharashtra, O = Govt. of Maharashtra, OU = Directorate of Information Technology
Reason: I am the author of this document
Location: Mantralaya
Date: 2013.02.04 18:58:12 +05'30'



| Sr. No. | Course Name | Code No. | Duration |
|---|---|---|---|
| ६३ | C.C. IN ADVANCE COMPUTER APPLICATION | १०१२०१ | One Year |
| ६४ | C.C. IN COMPUTER TEACHERS TRAINING COURSE | १०१२०२ | One Year |
| ६५ | C. C.IN COMPUTER SCIENCE | १०१४०१ | Two Years |
| ६६ | C.C. IN COMPUTER SOFTWARE TECHNOLOGY | १०१४०२ | Two Years |
| ६७ | C.C. IN COMPUTER SOFTWARE DESIGN | १०१४०३ | Two Years |
| ६८ | C.C. IN COMPUTER PROGRAMMING | १०१४०४ | Two Years |
| ६९ | C.C. IN COMPUTER WEB TECHNOLOGY | १०१४०५ | Two Years |
| ७० | C.C. IN COMPUTER APPLICATIONS | १०१४०६ | Two Years |
| ७१ | C.C. IN COMPUTER OPERATOR | १०१४०७ | Two Years |
| ७२ | C.C. IN COMPUTER INFORMATION TECHNOLOGY | १०१४०८ | Two Years |
| ७३ | C.C. IN COMPUTER CNC PROGRAMMER | १०१४०९ | Two Years |
| ७४ | C.C.IN COMPUTER SOFTWARE CONSULTANT | १०१४१० | Two Years |
| ७५ | C.C. IN JAVA PROGRAMMER | १०१४११ | Two Years |
| ७६ | C.C. IN OPERATING SYSTEM ENGINEER | १०१४१२ | Two Years |
| ७७ | C.C. IN COMPUTER SYSTEM ANALYST | १०१४१३ | Two Years |
| ७८ | C.C. IN COMPUTER ASSEMBLING & DESIGN | १०१४१४ | Two Years |
| ७९ | C.C. IN COMPUTER NETWORKS | १०१४१५ | Two Years |
| ८० | C.C. IN COMPUTER NETWORK ADMINISTRATOR | १०१४१६ | Two Years |
| ८१ | C.C. IN COMPUTER GRAPHICS | १०१४१७ | Two Years |
| ८२ | C.C. IN COMPUTER ANIMATION | १०१४१८ | Two Years |
| ८३ | C.C. IN COMPUTER AIDED DESIGN (CAD) | १०१४१९ | Two Years |
| ८४ | C.C. IN AUTO CAD TECHNIQUES | १०१४२० | Two Years |
| ८५ | C.C. IN D.T.P. TECHNIQUES | १०१४२१ | Two Years |
| ८६ | C.C. IN GRAPHIC DESIGN TECHNICIAN | १०१४२३ | Two Years |